स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade



NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT
Phone: (02462) 229242
Fax : (02462) 229574
Website: www.srtmun.ac.in
E-mail: srtmun.nss@gmail.com

रासेयो/शाळाबाह्य/2015–16/1625-1740 दिनांक : 07/01/2016.

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो.राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालय,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड.

**विषयः– शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणाचा कृती आराखडा सहभागा बाबत.**

संदर्भः– रासेयो२०१५/प्र.क्र.१७२/१५/साशि–७ उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष एल्फिस्टन तंत्रशिक्षण परिसर ३, महापालिका मार्ग धोबीतलाव, मुंबई.–४०० ००१. दिनांक २२ डिसेंबर २०१५.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मा. राज्यसंपर्क अधिकारी व विशेष कार्यअधिकारी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, रा.से.यो. कक्ष मंत्रालय, महाराष्ट्र शासन मुंबई यांच्या पत्रान्वये दिनांक १५ जानेवारी २०१६ ते दिनांक ३१ जानेवारी २०१६ या कालखंडामध्ये शाळाबाह्य सर्वेक्षणाचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार स्थानिक स्वयंसेवी बरोबर संपर्क साधून शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणासाठी मदत करावी, व त्याबाबतचा आहवाल रा.से.यो. विभागात त्वरीत सादर करावा. ही विनंती.

- सोबत शासनाचे परिपत्रक जोडत आहोत.

प्रा.एन.व्ही.कांबळे
रासेयो कार्यक्रम समन्वयक,
प्रस्तुत विद्यापीठ.

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : रासेयो २०१५/प्र.क्र.१७२/१५/ साशि ७,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष,
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर,
३,महापालिका मार्ग, धोबीतलाव,
मुंबई – ४०० ००१.
दिनांक – २२ डिसेंबर,२०१५.

प्रति,

सर्व कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,
सर्व अकृषी/कृषी विद्यापीठे/+२ स्तर/व्यवसाय /तंत्रशिक्षण संस्था

विषय :- **शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणाचा कृती आराखडा.**

संदर्भ :- समक्रमांक दिनांक १७.१२.२०१५ चे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण नियोजनाबाबत दोन दिवशीय कार्यशाळा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे संपन्न झाली. त्या कार्यशाळेमध्ये मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग व मा.आयुक्त (शालेय), महाराष्ट्र राज्य यांच्यासमवेत झालेल्या चर्चेनुसार राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांनी दि.१५.१.२०१५ ते ३१.१.२०१५ या कालखंडामध्ये सर्वेक्षण करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांबरोबर मदत करावी अशी सूचना करण्यात आली. त्यानुसार जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावर समित्यांमध्ये जिल्हा समन्वय व विभागीय समन्वय संदस्य म्हणून सहभागी होतील व त्या समितीच्या बैठकीमध्ये आपण सर्वेक्षणाबाबत चर्चा करुन योग्य त्या गटामध्ये शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करुन मुलांना प्रवेशित करावे.

२. राष्ट्रीय सेवा योजनेने आपला आराखडा पुढीलप्रमाणे तयार करावा :-

i) संपूर्ण जिल्हयामध्ये एकूण तालुक्यांची संख्या विचारात घेऊन कृती आराखडा तयार करावा. जसे -एका जिल्हयामध्ये ११ तालुके असल्यास, एका तालुक्यामध्ये दोन महाविद्यालय व ७२ गावे असल्यास प्रत्येक महाविद्यालयाने ३६ गावे निवडावीत व अधिक महाविद्यालये असल्यास समप्रमाणात गावांची विभागणी करावी.

ii) गाव व विद्यार्थी याची निवड करताना तो विद्यार्थी त्या गावातील रहिवाशीच असला पाहिजे अशा पध्दतीने निवड करावी जेणेकरुन त्याला प्रवास व इतर खर्च लागणार नाही.

iii) आपल्या अधिनस्त तालुक्यामधील एखाद्या गावातील विद्यार्थी रहिवासी नसल्यास ते गाव स्वयंसेवी संस्थांकडे हस्तांतरीत करावे.

iv) या व्यतिरिक्तही गावे शिल्लक राहिल्यास गट शिक्षण अधिकाऱ्याला त्या संदर्भात सर्वेक्षण करण्यास सुचवावे.

05/1/2016

v) आपल्या महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी व प्राचार्य यांनी संयुक्तरित्या विद्यार्थ्यांचे उद्बोधन करुन मगच त्यांना सर्वेक्षणाचे फॉर्म द्यावेत व ते फॉर्म भरुन आणल्यानंतर शाळाबाह्य मुले सापडल्यास त्याला त्याच गावातील किंवा भागातील शाळेत प्रवेशित करण्यासाठी त्या शाळेचे मुख्याध्यापक तथा केंद्र प्रमुख व गट शिक्षण अधिकारी यांच्या ती कागदपत्रे हस्तांतरीत करावी व त्याची एक कॉपी जिल्हा समन्वयकांमार्फत विद्यापीठाच्या समन्वयकांकडे पाठवावी.

vi) सर्वेक्षण करताना आपल्या गावातील एकही मुल शाळाबाह्य राहणार नाही याची काळजी कार्यक्रम अधिकारी तथा जिल्हा समन्वयक, स्वयंसेवी संस्था व त्या गावातील मुख्याध्यापक यांनी घ्यावी.

vii) ज्या गावामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी निवासी नसेल त्या गावामध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सर्वेक्षणाच्या कामी मदत घ्यावी व ती जबाबदारी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यांची राहील.

viii) या व्यतिरिक्तही काही गावे तथा विभाग शिल्लक राहत असल्यास त्या भागातील व्यवसाय शिक्षणाच्या विद्यार्थ्यांना समाविष्ट करावे.

३. जिल्हास्तरीय समितीमध्ये जिल्हा समन्वयकाने उपस्थित राहणे बंधनकारक असून त्याने त्याला उपस्थित होणाऱ्या सर्व प्रश्नांचा साकल्याने विचार त्या समितीमध्ये मांडावा व समितीच्या सहाय्याने तो प्रश्न निकाली काढावा.

४. कार्यक्रम समन्वयकांनी तात्काळ सर्व जिल्हा समन्वयकांची तातडीची बैठक आयोजित करुन त्यांना उपक्रमाची सर्वंकष माहिती द्यावी व शालेय शिक्षण विभागाकडून येणाऱ्या कृती आराखड्यानुसार कार्यवाही करण्याचे आदेश निर्गमित करावेत.

५. जिल्हा समन्वयकांनी सर्व कार्यक्रम अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करुन त्यांना सर्व गावातील रहिवासी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी तयार करण्यात सांगावे. साधारणत: एका गावात ५ ते १० विद्यार्थी सर्वेक्षणासाठी वापरावेत.

(डॉ.अतुल हं.साळुंके)
राज्यसंपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी

प्रत -

१)प्रधान सचिव, उच्च व व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.
२) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.
३) उप सचिव (साशि७), उच्च व व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.
४) उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई